# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**महापालिका सचिव कार्यालय,**
**दिनांक :- २६/०७/२०२२**

## <u>मा. महासभा</u>
**मा. महासभा सुचना क्र. ०३**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती ------------------------------------------------**
**नगरसेवक / नगरसेविका,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा बुधवार दि. ०३/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०३ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

**(वासुदेव शिरवळकर)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

### मा. महासभा बुधवार दि. ०३/०८/२०२२ सभा सुचना क्र. ०३ विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| -- | **प्रश्नोत्तरे -** |
| -- | **मागील सभांचे इतिवृत्तांत -** |
| २० | दि. 25/01/2022 व 30/03/2022 रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| -- | सर्व निवडणूका - निरंक |
| -- | सर्व नियुक्त्या - निरंक |
| -- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| -- | विनंती अर्ज - निरंक |
| -- | स्थायी परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - |
| २१ | महिला व बालकल्याण समिती अंतर्गत विविध योजना / प्रशिक्षणासाठी लाभार्थी निवड करणेकरिता धोरण निश्चित करणेबाबत. (मा. महिला व बालकल्याण समिती सभा दि. 03/06/2022 रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. 04, ठराव क्र. 04) |
| २२ | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव "हर घर तिरंगा" व "स्वराज्य महोत्सव" उपक्रम राबविण्याबाबत. |
| २३ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसमधून मोफत प्रवासाची सवलत देणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेबाबत. |
| २४ | मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील सहायक अधिसेविका (गट-ब) उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब) उप-मुख्य उद्यान अधिक्षक (गट-ब) कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ) शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत. |
| २५ | लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासन अनुदानातून कामे करणेबाबत. |
| २६ | उत्तन डम्पिंग ग्राऊंड प्रकल्प येथे अग्निशमन विषयक उपाययोजना करणेबाबत. |
| २७ | मा. महासभा दि. 02/09202, ठराव क्र. 42 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या चतुर्थश्रेणी कर्मचारी तसेच वाहनचालक कर्मचाऱ्यांना यांच्याकरीता दर दोन वर्षांनी गणवेश पुरवठा वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करणेबाबतच्या निश्चित असलेल्या DBT धोरणास कर्मचाऱ्यांचा प्रतिसाद न मिळाल्यामुळे DBT धोरणाचा पुर्नविचार होऊन महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित यांच्यामार्फत कपडा खरेदी करणे व गणवेशाची शिलाई दर निश्चित करुन त्यांच्या गणवेशाची शिलाई कामी निविदा / दरपत्रकाद्वारे ठेकेदाराची नेमणूक करुन शिलाई करुन गणवेश देणेबाबतचे नव्याने धोरण निश्चित करणेबाबत. |
| २८ | महापालिकेच्या DCH/DCHC/CCC/रुग्णालय येथे तसेच मुख्य कार्यालय, अतिक्रमण कारवाईकरीता प्रभाग कार्यालय क्र 01 ते 06 व मनपाच्या इतर मालमत्तांच्या सरंक्षणार्थ पुरुष व महिला सुरक्षारक्षक महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून पुरवठा करणेस मुदतवाढ देणेबाबत. |
| २९ | वैद्यकीय आरोग्य विभागाकरीता निविदा मागविणे कामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ३० | ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे. |
| ३१ | अपंग कल्याण योजने अंतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीबाबत. |

| | |
|---|---|
| ३२ | अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकरीता यंत्रसामुग्री, वाहने व मनुष्यबळ उपलब्ध करणेकामी होणाऱ्या खर्चास मा. महासभेची प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत. |
| ३३ | भाईंदर उत्तन 30 मीटर रुंदीच्या रस्त्याऐवजी 20 मीटर रुंदीचा करणे व 18 मीटर रुंदीऐवजी समांतर 30 मीटर रुंदीचा रस्ता करणे. |
| ३४ | उत्तन येथे सर्वधर्मीय स्मशानभमी, दफनभूमीसाठी जागेचे आरक्षण करणे. |
| ३५ | मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ) माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ) व सिस्टिम ॲनालिस्ट (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत. |
| ३६ | "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास" या योजनेअंतर्गत 06 प्रभागात "बॅटरी ऑपरेटेड लिटर सक्शन मशिन "गोब्बलर" (सफाई यंत्र)" एकूण 12 मशिन खरेदी करणेबाबत. |
| ३७ | मनपा क्षेत्रातील स्मशानभुमिमध्ये दैनंदिन साफसफाई व प्रेत दहन करणेकामी कंत्राटी सफाई कामगारांचा पुरवठा कामाची निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ३८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे खारी स.क्र.१५४, १५१, व १५३ या क्षेत्रावरील आ.क्र.१०२ (बगीचा) आरक्षणातून विद्यमान इमारतींना वगळण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत. |

**(वासुदेव शिरवळकर)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महानगरपालिका सचिव कार्यालय**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**दिनांक :- २६ जुलै २०२२**

मा. महासभा दि. 03/08/2022
प्रकरण क्र. 29 करिता

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग , भाईंदर(प.)
ता.जि.ठाणे-401101

## मा.महिला व बालकल्याण समिती

सभा दि.03 /06 /2022

**प्रकरण क्र.04 :- महिला व बालकल्याण समिती अंतर्गत विविध योजना/ प्रशिक्षणासाठी लाभार्थी निवड करणेकरिता धोरण निश्चित करणेबाबत..**

**ठराव क्र.04 :-**

महिला व बालकल्याण समिती अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेकरिता महापालिका क्षेत्रात मोठया प्रमाणात लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त होत आहेत. सदर अर्जामध्ये गरीब व गरजू लाभार्थी बरोबर इतर उच्च वर्गातील देखील लाभार्थी अर्ज सादर करत आहेत. त्यामुळे लाभार्थी निवड करणेस अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे सदर योजना व प्रशिक्षणाकरिता लाभार्थी निवडीसाठी अटीशर्तीनिश्चित करणे आवश्यक आहे.

- **महिला व बालकल्याण समिती मार्फत राबविण्यात येणारे विविध प्रशिक्षणासाठी लाभार्थी निवडीचे निकष :-**

| अ.क्र. | योजना/प्रशिक्षणाचे नाव | उपलब्ध तरतुद | लाभार्थ्यांची संख्या (सन 2019-20 च्या निविदेतील दरानुसार) | लाभार्थी निवडीचे निकष |
|---|---|---|---|---|
| 1. | एम.एस.सी.आय.टी कोर्स | 25.00 लाख | **555 लाभार्थी** | 1) महिला लाभार्थ्यांकडे पिवळया/केसरी रंगाची शिधापत्रक असणे आवश्यक राहिल.<br>2) महापालिका क्षेत्रातील 5 वर्षाचा रहिवाशी पुरावा |
| 2. | फॅशन डिझायनिंग कोर्स | 25.00 लाख | **969 लाभार्थी** | |
| 3. | ब्युटीपार्लर, नेलआर्ट/मेंहदी कोर्स | 45.00 लाख | **471 लाभार्थी** | |
| 4. | वेब-डिझायनिंग कोर्स | 20.00 लाख | **380 लाभार्थी** | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5. | ड्रायव्हिंग प्रशिक्षण (चार चाकी/तीन/दोन चाकी) | 25.00 लाख | **373 लाभार्थी** | 3) स्थानिक नगरसेवकांचे शिफारस पत्र (प्रभागनिहाय)<br>4) तांत्रिक प्रशिक्षणाकरिता एस.एस.सी.उत्तीर्ण असलेले शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र<br>6) वय किमान 18 वर्ष व कमाल 45 वर्ष इतके असावे<br>7) पात्र लाभार्थींना एका वर्षात एकाच योजनेचा लाभ घेता येईल.<br>8) लाभार्थींची निवडीसाठी उपरोक्त निकषासह अर्ज मागवून त्यास पात्र अर्ज महिला व बालकल्याण समितीच्या मान्यतेने अंतिम करणेत येतील |
| 6. | जुडो-कराटे/योगा प्रशिक्षण | 15.00 लाख | **300 लाभार्थी** | |
| 7. | बेसिक कॅम्प्युटर/डिटी.पी कॅम्प्युटर, टॅली कॅम्प्युटर/ इग्लिंश स्पिकिंग कोर्स करणे | 3.00 लाख | **33 लाभार्थी** | |
| 8. | बेकिंग /कापडी पिशवी बनविणे कोर्स | 5.00 लाख | **175 लाभार्थी** | |

तरी, वरीलप्रमाणे अनु.क्र.01 ते 08 मधील विविध प्रशिक्षणाकरिता महिला लाभार्थी निवडीचे निकष निश्चित करणेस हि सभा मंजुरी देत आहे.

सूचक Shanu Gohil (SHANU GOHIL)

Hema R. Belani
अनुमोदन
(Hema Rajesh Belani)

ठराव सर्वानुमते मंजुर

ठराव
गोषवारा प्राप्त दि. २९/०६/२०२२ ३:१:३५ वा.
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र. 29 वर्ष :- 2022-23

(सही)
**सभापती,**
**महिला व बालकल्याण समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सही)
लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.03/8/2022

## सामान्य प्रशासन विभाग

प्रकरण क्र. २२

**स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव "हर घर तिरंगा" व "स्वराज्य महोत्सव" उपक्रम राबविण्याबाबत.**

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत १२ मार्च, २०२१ ते दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत "आजादी का अमृत महोत्सव" या उपक्रमाचे आयोजन करण्याबाबत केंद्र शासनाने कळविले आहे. त्यानुसार राज्यात सदर कालावधीमध्ये "भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" साजरा करण्याबाबत शासन निर्णय/शासन पत्रांद्वारे मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाने जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात व देशभक्तीची जाज्वल भावना कायम स्वरुपी मनात राहावी व त्याचे संस्मरण व्हावे या उद्देशाने "आजादी का अमृत महोत्सव" अंतर्गत दिनांक ११ ऑगस्ट २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये देशभरात "हर घर झंडा" हा उपक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना एकत्रितरित्या खालीलप्रमाणे पुन्हा उद्धृत करण्यात येत आहेत :

१) सर्व शासकीय / निमशासकीय यंत्रणांनी प्रसार माध्यमातून देशाभिमान व जाणीवजागृतीची मोहिम प्रभावीपणे राबवावी.

२) दिनांक ११ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत प्रत्येक शासकीय/निमशासकीय व खाजगी आस्थापनांवर तसेच, प्रत्येक घर व इमारतींवर राष्ट्रध्वज उभारणेसाठी नागरीकांना प्रोत्साहीत करावे.

३) नागरिकांनी राष्ट्रध्वज स्वत: विकत घेऊन उभारण्यासाठी त्यांना प्रेरीत करावे.

४) सदर राष्ट्रध्वज उभारणीसाठी जास्तीत जास्त प्रसिद्धी करावी. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक माध्यमांचा जास्तीत जास्त वापर करण्यात यावा.

५) केंद्रिय गृह विभाग यांच्या दिनांक ३० डिसेंबर २०२१ रोजीच्या अधिसूचनेन्वये भारतीय ध्वज संहिता २००२ भाग - १ मधील परिच्छेद १.२ मधील राष्ट्रध्वज हे "हाताने कातलेल्या किंवा विणलेल्या लोकर/सुत/सिल्क /खादी कापडापासून बनविलेला असेल", या तरतूदीमध्ये बदल करण्यात आला असून सदर बदलानुसार राष्ट्रध्वज हे हाताने कातलेल्या आणि हाताने विणलेल्या किंवा मशीनद्वारे तयार केलेल्या सुत / पॉलिस्टर/ लोकर/ सिल्क / खादी पासून बनविलेल्या कापडाचे असावेत असा उल्लेख केला आहे. या बदललेल्या तरतूदीनुसार तयार करण्यात आलेल्या राष्ट्रध्वजाचा वापर या प्रयोजनासाठी करता येईल.

६) संगीतातूनही राष्ट्रध्वजाबाबत वेगवेगळ्या पद्धतीने सादरीकरण करता येईल.

७) "हर घर झंडा" या कार्यक्रमाच्या अनुषंगाने नियोजनबद्ध कार्यक्रमाची आखणी करावी.

८) या उपक्रमामध्ये राज्य / देशातील / परदेशातील सहभागी होणाऱ्या व्यक्तींची नोंद घ्यावी.

९) राष्ट्रध्वज मुबलक उपलब्ध होणेबाबत खात्री संबंधित यंत्रणांनी करावी.

१०)ऑनलाईन व ऑफलाईन राष्ट्रध्वज विक्री केंद्र राज्याने उपलब्ध करून द्यावे.

११) भारतीय ध्वज संहितेचे पालन व्हावे व जाणते अजाणतेपणी राष्ट्रध्वजाचा अपमान होऊ नये, याची दक्षता घेण्याबाबत नागरिकांमध्ये जाणीव-जागृती करावी.

१२) "हर घर झंडा" या उपक्रमांतर्गत कार्यक्रमाची छायाचित्रे, चित्रफिती, ध्वनीमुद्रण केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाच्या amritmahotsav.nic.in या संकेत स्थळावर अपलोड करावे.

१३) नागरिकांमध्ये या उपक्रमाबाबत रुची निर्माण करण्यासाठी वेबसाईट, ई-कॉमर्स तसेच राष्ट्रध्वज भेट देणे अशा माध्यमांचा आधार घेण्यात यावा.

१४) स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस यंत्रणा, शाळा व महाविद्यालये, परिवहन, आरोग्य केंद्रे, स्वस्त भाव धान्य दुकाने, सहकारी संस्था अशा सर्व सामान्य नागरीकांशी निगडीत यंत्रणांचा वापर करुन सदर कार्यक्रम यशस्वी करण्यात यावा. याबाबतचा मार्गदर्शक कृती आराखडा सोबत परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविण्यात आला आहे.

## परिशिष्ट-अ

**1)कृती आराखडा : आरोग्य केंद्रे, रुग्णालये + ANM**

- आरोग्य उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, सामुदायिक आरोग्य केंद्रे, उपविभागीय रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालये यांचा या उपक्रमात महत्वपूर्ण सहभाग अपेक्षित आहे.
- संदेश वहन साहित्य - प्रसिध्दी पत्रके, उभे फलक, बॅनर्स इ. स्थानिक भाषेत ठळकपणे प्रदर्शित करावेत.
- प्रसुतिगृहातील सहाय्यक परिचारिकांना तिरंग्याची माहिती असलेल्या पुस्तिका (फ्लिप बुक्स) यांचे वाटप करावे.
- लहान मुलांना रंग देण्यासाठी छापील आकृत्या, छापील कागद (कटआउट्स, प्रिंटआउट्स) उपलब्ध करुन द्यावेत.
- रुग्णालयातील प्रतिक्षा कक्षामध्ये डिजिटल पडदे लावावेत, ध्वज आणि कार्यक्रम संबंधित माहिती प्रदर्शित करावी, तिरंगा ध्वजगीत लावावे, आजादी का अमृत महोत्सव इ. बाबतचे चित्रपट दाखवावेत.

**2) कृती आराखडा: शाळा आणि महाविद्यालये**

- शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्यामार्फत जाणीव-जागृती करणे. सदर योजनेचा प्रचार, प्रसार करण्यासाठी या माध्यमाचा वापर करावा.
- राष्ट्रध्वजाला समर्पित विशेष संमेलने / शिबीरे / चर्चासत्र इ. चे आयोजन करावे.
- #hargharjhanda या हॅशटॅगखाली समाज माध्यमांवर छायाचित्रे प्रसारित करावीत. राज्य/जिल्हा/शाळेचा उल्लेख करुन सोशल मीडियावर फोटो शेअर करावेत.
- पालकांचा सहभाग :- सर्व पालकांना सहभागी होण्यासाठी विशेष दैनंदिन सूचना पत्रे, पत्रके वितरीत करावीत.
- पालक शिक्षक सभा :- हर घर तिरंगा विषयी माहिती देण्यासाठी पालक शिक्षक सभांचे आयोजन करावे.

3) **कृती आराखडा : परिवहन सुविधा**

- राज्य परिवहनच्या बसेस "हर घर तिरंगा" याच्या संदेशाने रंगविल्या जाव्यात.
- पथकर व तपासणी नाके यांचे माध्यमातून हर घर तिरंगा या कार्यक्रमाचा प्रचार, प्रसार व जागरुकता निमार्ण करण्यासाठी माहिती पुस्तिका, प्रसिध्दी पत्रके इ. वितरित करणे.
- अंतरसंपर्क (इंटरकॉम) आणि ध्वनीचित्रमुद्रण (व्हिडिओ) प्रणालीद्वारे राज्यांतर्गत प्रवासी बसेसमध्ये - सांगितिक जाहिराती (जिंगल्स), ध्वनीमुद्रित ध्वजगीत वाजविणे, ध्वज संबंधित चित्रफित दाखविणे.

4) **कृती आराखडा :- प्रसार माध्यमे संकेतस्थळ, भिंतीचित्रे इ.**

- सर्व राज्य सरकारच्या संकेतस्थळांवर अमृत (amritmahotsav.nic.in) हर घर तिरंगाच्या दुवा जोडावा.
- राज्य आणि जिल्हा स्तरावरील कृती आराखड्याबद्दल प्रसार माध्यमांना विशेष माहिती देणे. याअंतर्गत -
- १ जूनपासून दररोज विशेष बातमीपत्र सुरु करण्यासाठी दुरदर्शनचा, आकाशवाणीचा वापर करावा.
- स्थानिक प्रसिध्दी अधिकाऱ्यांनी सर्व कार्यक्रमांचे योग्य वार्तांकन करावे व त्यावर प्रकाशझोत टाकावा.
- ध्वज निर्मिती, वितरण, देशभक्ती यांच्याशी संबंधित असलेल्या स्वारस्यपूर्ण कथा निर्माण कराव्यात.
- सर्व सार्वजनिक बदलीच्या ठिकाणी भिंतीचित्रे (वॉल पेंटिंग्ज) निर्माण करावीत.

5) **कृती आराखडा : महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगरपंचायत**

- सर्व महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत भागातील प्रसारासाठी महत्वपूर्ण माध्यम.
- महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत यांच्या प्रशासकीय प्रमुखांनी संबंधित वॉर्डच्या अधिकाऱ्यांसमवेत समन्वय करुन संपर्क सत्रे / चर्चासत्रे याचे आयोजन करावे.
- प्रत्येक वॉर्डात ध्वज वितरण आणि विक्री केंद्राची निश्चिती करावी.
- बचत गटांचा सहभाग : स्थानिक शिलाई काम करणाऱ्या गटांद्वारे ध्वजांची शिलाई/ निर्मिती करता येईल.
- विक्री / वितरण केंद्र म्हणून महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत कार्यालयांचा उपयोग करुन घ्यावा.
- महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत या आस्थापनांना ध्वजांची मोठ्या प्रमाणावर खरेदी करता येईल. सदर खरेदी स्थानिक घरांच्या संख्येवर आधारीत असावी.
- सर्व प्रशासकीय इमारती / संस्थांवर ध्वजारोहण करावे.
- स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करुन घ्यावे.

- संदेश वहन साहित्य - प्रसिध्दी पत्रके, उभे फलक, बॅनर्स इ. स्थानिक भाषेत ठळकपणे प्रदर्शित करावेत.
- महानगर पालिका / नगरपालिकांच्या रुग्णालयातील प्रतिक्षा कक्षांमध्ये डिजिटल पडदे लावावेत, ध्वज आणि कार्यक्रम संबंधित माहिती प्रदर्शित करावी, तिरंगा ध्वजगीत लावावे, आजादी का अमृत महोत्सव इ. बाबतचे चित्रपट दाखवावेत.
- राष्ट्रध्वजाला समर्पित विशेष संमेलने / शिबीरे / चर्चासत्र इ. चे आयोजन करावे.
- महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत वसाहतींमध्ये राष्ट्रध्वजाची विक्री व वितरण केंद्रे निर्माण करण्याची विशेष मोहीम घ्यावी.
- जाहिरात फलक, बॅनर, फ्लिप बुक्स, सांगितिक जाहिराती(जिंगल्स), ध्वनीमुद्रित इ. चे नमुने.

मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर तिरंगा" उपक्रम राबविण्याच्या अनुषंगाने अंमलबजावणी करण्याकरिता अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. तसेच सदरचा उपक्रम राबविण्याबाबत कार्यान्वयन समिती स्थापन करण्यात आली आहे.

तरी शासनाने परिशिष्ठ "अ" नुसार दिलेल्या कृती आराखड्याप्रमाणे स्थानिक लोकप्रतिधींना सहभागी करून घ्यावे असे कळविले आहे. तरी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी सदर उपक्रमात सहभागी होऊन नागरिकांना प्रोत्साहित करणे तसेच सदर कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्याकरीता आपण मोलाचे सहकार्य करावे ही विनंती.

धन्यवाद !

(दिलीप ढोले)
**आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. 29/ 7 /२०२२ वेळ. ४:१५
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र. २८ ........ वर्ष :- २०२२/२३

नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. 03/05/२०२२

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. 23 :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसमधून मोफत प्रवासाची सवलत देणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेमध्ये 1 ते 9 वी पर्यंत वर्ग सुरू करण्यात आले आहेत. त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसमधुन मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. सहासभा ठराव क्र.62 दि.20/09/2006 अन्वये पदवीपर्यंत महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना 20 दिवसाच्या दुहेरी प्रवासाचे भाडे आकारून सवलतीच्या दराने (50%) मासीक पास देणे व 30 दिवसाच्या प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देणेस मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सवलत देण्यात येत आहे.

सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बस सेवेसाठी NCC With VGF तत्वावर मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. यांची दि.29/01/2021 रोजी करारनामा करुन बस ऑपरेटर म्हणून नियुक्ती केली आहे. त्यानुसार दि.03/02/2021 पासून बससेवा मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. यांच्यामार्फत चालविण्यात येत आहे. सद्यस्थितीत परिवहन उपक्रमाकडे 74 बसचा ताफा उपलब्ध असुन दैनंदिन 70 बस 19 बस मार्गावर चालविण्यात येत असून दैनंदिन प्रवासी संख्या 75000 पर्यंत पाहेचली आहे. त्यानुसार तिकिट संकलन बस ऑपरेटर यांची जबाबदारी असुन त्यांचेसमवेत केलेल्या करारानुसार सवलतीची रक्कम महानगरपालिकेकडून प्रतिपूर्ती स्वरुपात अदा करण्याची तरतूद आहे. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या सवलतीच्या रक्कमेची प्रतीपूर्ती परिवहन उपक्रमाकडून बस ऑपरेटर यांना अदा करून सदरची रक्कम शिक्षण विभागाच्या निधीतून परिवहन उपक्रमास हस्तांतरीत करावी लागेल.

मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असतात. त्यामुळे बसप्रवास मोफत दिल्यास शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळू शकेल. तरी, मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसमधून प्रवासाची मोफत सुविधा उपलब्ध करून देणेबाबत धोरणात्मक निर्णयासाठी प्रस्ताव मा.महासभेत सादर करण्यात येत आहे.

(डॉ.संभाजी पानपट्टे)
मा.अति. आयुक्त तथा
परिवहन व्यवस्थापक
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त यांचे दि. 18/07/2022 रोजीच्या मान्यतेने.)

C:\Users\Parivahan\Desktop\Goshwara - Vidyarthi Pass savalat milanebabt.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. 03 / 08 /2022

### //गोषवारा//

प्रकरण क्र. २४ मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत.

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि. 25 नोव्हेंबर, 2021 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-ब) या संवर्गात पदोन्नतीकरीता शैक्षणिक अर्हता व पात्रता विहित करण्यात आली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका आकृतीबंधानुसार व मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 नुसार सहायक अधिसेविका - 01 पद, उप-मुख्य स्वच्छता अधिकारी -02 पदे, उप-मुख्य उदयान अधिक्षक -02 पदे, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) - 03 पदे, शाखा अभियंता (स्थपत्य) - 16 पदे व अग्निशमन केंद्र अधिकारी - 08 पदे ही पदोन्नतीने भरावयाची आहेत.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :-एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट,2019 नुसार शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.3 (3) नुसार विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची अ.क्र. i) ते Xiii) मधील निकषांच्या आधारे पात्रता तपासणेबाबत नमुद आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे, 2021 नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.2797/2015 या प्रकरणी दि.04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावी असे निर्देश आहेत. तसेच सदर पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील अशी कार्यवाही करताना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता

यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये असे निर्देश आहेत.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.दिव्यांग 2015/प्र.क्र.171/16-अ, दि.23 जुलै, 2021 नुसार सर्व आस्थापनांनी गट-अ व गट-ब संवर्गातील पदोन्नतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.22/07/2021 रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे (100%) भरण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशी कार्यवाही करताना मा.उच्च न्यायालयाच्या दि.22/07/2021 रोजीच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश आहेत.

सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब) , कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) व अग्निशमन केंद्र अधिकारी या पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54(1) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि.22/12/2021, दि.09/02/2022, दि.09/03/2022 व दि.31/03/2022 रोजी आयोजित करण्यात आली होती.

सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) व अग्निशमन केंद्र अधिकारी या संवर्गातील रिक्त पदावर पदोन्नती देणेबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.01 ऑगस्ट, 2019 मध्ये विहित कार्यपध्दतीनुसार रिक्त पदांचा व विचार क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचा पदोन्नती देण्याचा प्रस्ताव पदोन्नती निवड समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. पदोन्नती निवड समितीने खालील अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती समितीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात अटीशर्तीच्या अधिन राहून पदोन्नती देणेकरीता शिफारस केली आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव व वेतनश्रेणी | सद्याचे पद | पदोन्नतीचे पद | नेमणूक प्रवर्ग | पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्रीम. स्वाती आ. राणे<br>S-14 38600-122600 | परिसेविका | सहाय्यक अधिसेविका | खुला | S-15 41800-132300 |
| 2. | श्री.राजकुमार कांबळे<br>S-14 38600-122800 | स्वच्छता अधिकारी | उप मुख्य स्वच्छता अधिकारी | खुला | S-15 41800-132300 |
| 3. | श्री.संदिप चंद्रकांत शिंदे<br>S-14 38600-122800 | | | | |
| 4. | श्री. नागेश विरकर<br>S-13 35400-112400 | उद्यान अधिक्षक | उप मुख्य उद्यान अधिक्षक | खुला | S-15 41800-132300 |
| 5. | श्री. हंसराज मेश्राम<br>S-13 35400-112400 | | | | |
| 6. | श्री. किरण राठोड<br>S-20 56100-177500 | उप-अभियंता (स्थापत्य) | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | खुला | S-23 67700-208700 |
| 7. | श्री. शरद नानेगांवकर<br>S-20 56100-177500 | | | | |
| 8. | श्री.शिरीषकुमार पवार<br>S-13 35400-112400 | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | शाखा अभियंता (स्थापत्य) | खुला | S-15 41800-132300 |
| 9. | श्रीम.प्रांजल शैलेश कदम | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | S-13 35400-112400 | | | | |
| 10. | श्री.सतिश जे.तांडेल<br>S-13 35400-112400 | | | | |
| 11. | श्री.राजेंद्र बा.पांगळ<br>S-13 35400-112400 | | | | |
| 12. | श्री.अरविंद ह. पाटील<br>S-13 35400-112400 | | | | |
| 13. | श्री.भुपेश द.काकडे<br>S-13 35400-112400 | | | | |
| 14. | श्री.उत्तम य. रणदिवे<br>S-13 35400-112400 | | | | |
| 15. | श्री.उमेश अवचर (अपंग)<br>S-13 35400-112400 | | | | |
| 16. | श्री.सचिन ना.पाटील<br>S-13 35400-112400 | | | | |
| 17. | श्री.यतिन व. जाधव<br>S-13 35400-112400 | | | | |
| 18. | श्री.दिलीप रणवरे<br>S-13 35400-112400 | | | | |
| 19. | श्री.धनंजय वसंत कनोजे<br>S-13 35400-112400 | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-15 41800-132300 |
| 20. | श्री.प्रकाश शंकर बोराडे<br>S-13 35400-112400 | | | | |

सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) गट-अ, शाखा अभियंता (स्थापत्य) व अगिशमन केंद्र अधिकारी संवर्गातील पद असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) अन्वये सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महापालिकेमध्ये निहित आहे.

त्यामुळे सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) व अगिशमन केंद्र अधिकारी या पदावर दिलेल्या पदोन्नतीस तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 मधील अनुक्रमांक 6 नुसार वर्ग-01 ची पदे पदोन्नतीने भरताना त्यास शासनाची पुर्वमंजुरी आवश्यक असल्यामुळे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ) व मा. विभागीय समितीने मान्यता दिल्यानुसार उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब) व अगिशमन केंद्र अधिकारी या पदास शासन मान्यता मिळण्याच्या अधिन राहून सदर पदोन्नतीने नेमणूक करणेसमा. महासभेच्या मंजुरीस्तव सादर.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**मा. महासभा दि. 03|05|2022**

**// गोषवारा //**

प्रकरण क्रमांक (२५) :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासन अनुदानातून कामे करणे बाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात्र राज्य शासनाच्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत सन 2021-22 या वर्षातील निधितून रु.5.00 कोटी रकमेची कामे प्रशासकीय मान्यतेसाठी मा. जिल्हाधिकारी ठाणे यांना सादर करावयाची आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.11, 13, 14 व 18 मध्ये सदर निधी वापरता येणार आहे. सदर निधी वापरता येणार आहे. यापूर्वी प्रभाग क्र.14 मधील कामे मंजूर असल्याने प्रभाग क्र.11, 13 व 18 मधील खालील प्रमाणे विकास कामे करण्याची आवश्यकता असल्याने सदर कामांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1. | मिरारोड (पुर्व) डी.जी. इलेक्ट्रॉनिक्स ते यो यो हाटेल पर्यंत गटार तयार करणे. | रु.78,10,000/- |
| 2. | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.13, सिल्व्हर सरीता येथील नर्मदा अपार्ट मागील नाल्यावर स्लॅब टाकणे. | रु.1,10,00,000/- |
| 3. | गौरव मंथन ते STP PLANT पर्यंत गटार बनवून मुख्य नाल्याला जोडणे. | रु.68,37,400/- |
| 4. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र.11 मधील नवघर स्मशानभुमी मध्ये गटार, गल्ली सी.सी. रस्ते आणि R.C.C. हॉल बनविणे तसेच इतर दुरुस्तीची कामे करणे. | रु.82,99,650/- |
| 5. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र.11 मधील शिर्डी नगर येथील अंतर्गत रस्ते व गटार बनविणे. | रु.1,09,99,100/- |
| 6. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र.11 मधील शिव शक्ती नगर येथील दिपक टॉवर ते जय अंबे चाळ क्र.1 पर्यंत गटाराची पुर्न:बांधणी करणे. | रु.25,99,800/- |
| 7. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र.11 मधील नवघर रोड येथील आनंद दिघे मैदानामध्ये रंगमंचाचे बांधकाम करणे. | रु.20,99,900/- |
| | **एकुण** | **रु.4,96,45,850/-** |

वरील कामांना प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी मा. महासभेच्या ठरावाची आवश्यकता असल्याने सदर ठराव पारीत करून मा. जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे प्रस्ताव पाठविणेकरीता मान्यता देण्यास शिफारस आहे.

**कार्यकारी अभियंता (साबां)**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. 03/05/२०२२

~~महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' मधील प्रकरण दोन (के) अन्वये प्रस्ताव~~

## //गोषवारा//

**प्रकरण क्र. :- ( २८ ) उत्तन डम्पिंग ग्राउंड प्रकल्प येथे अग्निशमन विषयक उपाययोजना करणेबाबत**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे उत्तन येथे गेली १२-१३ वर्षांपासुन डम्पिंग ग्राउंड प्रकल्प अस्तित्वात असुन सदर प्रकल्पात दररोज मोठया प्रमाणात कचरा जमा होत असतो सदर ठिकाणी कचरा जमा होउन कच-याचे ३०-३५ मी. उंचीचे अनेक डोंगर तयार झाले असुन सदर कच-यांच्या डोगरांना वारंवार मोठया प्रमाणात आग लागत असते. सदर आग विझविणेकरीता अग्निशमन विभागास पाचारण केले जाते. परंतू तेथील भौगोलीक परिस्थितीमुळे अग्निशमन कार्य करतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. सदर प्रकल्पाच्या ठिकाणी अग्निशमन वाहनास पाणी पुरवठा करणेकरीता कोणतीही उपाययोजना नसल्याने टँकरवर अवलंबुन रहावे लागते टँकरच्या मदतीने अग्निशमन कार्य करतांना टॅकरचे पाणी संपलेनंतर पाण्याकरीता टँकरची वाट बघावी लागते. त्यामुळे अग्निशमन कार्य करण्यास अडथळा होतो व आग विझणेस विलंब होतो.तसेच प्रकल्पाच्या खालील बाजुने रस्ता उपलब्धनसल्याने अग्निशमन वाहन आग विझविणेकरीता प्रत्यक्ष घटनास्थळी पोहचु शकत नाही. त्याकरीता सदर ठिकाणची आग विझविणेकरीता अग्निशमन वाहन दुरवर उभेकरुन होजची (HOSE PIPE) १००० ते १५०० फुटाची लाईन तयार करुन अग्निशमन (FIRE FIGHTING) कार्य करावे लागते. अश्या पध्दतीने अग्निशमन कार्य करतांना प्रत्यक्ष आगीच्या ठिकाणी ढिगा-यावरुन वाहने व होजची लाईन गेल्याने वाहने तसेच होज खराब होतात. तसेच होजची लाईन जीतकी लांब तितके त्या लाईनवर नियंत्रण अधिक ठेवावे लागते व पर्यायाने अधिक मनुष्यबळाची आवश्यकता भासते. तसेच सदर आटोक्यात आणण्यास ७-१० दिवसापर्यंत अहोरात्र काम करावे लागते अश्यावेळी अग्निशमन वाहनांचे इंजीन २४ तास सतत ७ ते १० दिवस सुरु ठेवल्याने वाहनांचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे आणि अशी क्षतीग्रस्त वाहने नंतर नागरी सेवेकरिता वापरणे अडचणीचे ठरेल पर्यायानें वाहनांचे मेन्टनंस देखील वाढते. तसेच भौगोलीक परिस्थिती नुसार सदरचा भाग उंचीवर असल्याने वेगाच्या वा-यामुळे सदर आग जलद पसरते घटनास्थळी आगीचे प्रमाण अधिक वाढल्यास अग्निशमन विभागाचे अधिकारी, कर्मचारी, अग्निशमन वाहने, वॉटर टँकर इ. सर्व फौजफाटा डंम्पीग कच-याच्या आगीवर काम करत असतो अश्या परिस्थितीत शहरात आपातकालीन परिस्थिती उदभवल्यास जिवीत व वित्तहानी होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.

डंम्पींग प्रकल्पाची आग हि एक सामाजिक समस्या झाली असुन धुरामुळे स्थानीक नागरीकांना श्वसनाचा त्रास जाणवतो त्यामुळे सामाजिक कल्लोळ तयार होतो. तसेच सदर ठिकाणी वारंवार आगीच्या घटना घडत असल्याने अग्निशमन विभागास सदर आगीच्या ठिकाणी नेहमी जावे लागते सदर आग विझवितांना आगी सोबत प्रत्यक्ष धुराच्या लोळात काम काम करावे लागते सततच्या धुरामुळे अग्निशमन कर्मचा-यांचे देखील आरोग्य धोक्यात असते. वरील नमुद बाबीनुसार स्थानीक रहिवाश्यांचे तसेच अग्निशमन व आरोग्य विभागाचे अधिकारी / कर्मचारी यांचे आरोग्य, भौगोलीक परिस्थ्तिी, प्रकल्पाच्या ठिकाणचे अपुरे रस्ते, अपुरा पाणी पुरवठा तसेच प्रकल्पाच्या ठिकाणी अग्निशमन यंत्रणेची अपर्याप्तता इ. सर्व बाबी लक्षात घेता अग्निशमन कार्य परिणामकारक होणेकरीता सदर प्रकल्पाच्या ठिकाणी मुबलक पाणी पुरवठयासह अग्निशमन यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. त्यानुसार संदर्भ क्र. ३ नुसार बांधकाम विभागास ३ लाख लि. पाण्याचा साठा असलेली पाण्याची टाकी (पंम्प रुम संह) बांधणेस पत्र देण्यात आले आहे. संदर्भ क्र. १ अन्वये बांधकाम विभागाकडील प्राप्त नकाशानुसार सदर प्रकल्पाचे क्षेत्रफळ **एकुण** ७३,६७९.४९१ **चौ. मी.** असुन सदर प्रकल्पास वॉल कंम्पाउंड करण्यात आले आहे. संपुर्ण क्षेत्रात कच-याचे ३०-३५ मी. उंचीचे अनेक कच-याचे डोंगर तयार झाले आहेत. प्रकल्पाच्या पश्चिमेकडील खालच्या भागाकडे अग्निशमन वाहनांच्या अवागमनास रस्ता उपलब्ध नाही.

वरीलप्रमाणे प्रकल्पाची भौगोलिक रचना व प्रकल्पाच्या ठिकाणी घडत असलेल्या आगीच्या घटना लक्षात घेता सदर ठिकाणी फायर कोर्टयार्ड सिस्टिम विथ फायर हायड्रन्ट व मॉनिटर हि अग्निशमन यंत्रणा बसविणे हितावह ठरेल. सदरची यंत्रणा प्रकल्पाच्या ठिकाणी लागत असलेल्या सर्व प्रकारच्या लहान व मोठया आगींवर उपयुक्त ठरेल. महत्वाचे म्हणजे सदर ठिकाणी आग लागल्यास वेळेत विझविणे शक्य होणार आहे त्यामुळे नेहमी उद्भवणा-या उक्त नमुद [illegible]

यंत्रणेमुळे अग्निशमन वाहनांचे होणारे नुकसान कमी होणार आहे. तसेच सदर ठिकाणी अग्निशन यंत्रणा उभारल्याने अग्निशमन विभागावर पडणारा अतिरिक्त भार कमी झाल्यास पर्यायाने मिरा भाईंदर क्षेत्रातील रहिवाश्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाचे ठरणार आहे.

दि. २८/०२/२०२१ रोजी मा. महापौर यांचे दालनात मौजे उत्तन येथील रहिवासी यांचेशी झालेल्या डंम्पींग प्रकाल्पाच्या आगीबाबतीत झालेल्या चर्चेत मा. आयुक्त सो यांनी प्रकल्पाच्या ठिकाणी आगप्रतिबंधक उपाययोजना उभारण्याचे सूचित केले आहे. त्याअनुषंगाने मे. जे. एल. फायर सोल्युशन्स प्रा. लि. या अग्निशमन यंत्रणा उभारणा-या कंपनीसह संयुक्त पाहणी करुन आवश्यक अग्निशमन यंत्रणेनुसार तयार केलेल्या कामाच्या अंदाजित खर्चाबाबत (अंदाजपत्रक) तपशिल खालीलप्रमाणे.

| Sr. No. | Particulars | Qty. | Budgetary offer |
|---|---|---|---|
| 1 | Ø 150mm GI "c" Class Pipe IS-1239<br>Fitting , installation, RCC work, ,coating & paiting | 3120mtr. | 9516000 |
| 2 | Ø 80 mm GI "c" Class Pipe IS-1239 | 270mtr. | 587250 |
| 3 | Carbon Steel Water Monitor supply & Fitting<br>throw range minimum 30 mtr.<br>Flow- minimum 500-700 GPM | 52nos. | 1690000 |
| 4. | Ø 63 mm SS Single Headed Landing Valve IS 5290 | 52nos. | 348400 |
| 5. | Ø 63 mm Length 15mtr RRl FIRE HOSE PIPE | 104nos. | 1393600 |
| 6. | Double Door Hose Box 600mm X 750mm X250mm | 52nos. | 572000 |
| 7. | Cast Iron Siamese Connection, with 6" Flange & 4 male instantaneous with NRV. | 06nos. | 156000 |
| 8 | 100HP ELECTRIC MAIN PUMP 2850 LPM HEAD- 95Mtr. | 01nos | 518000 |
| 9 | 75HP ELECTRIC MAIN PUMP 2850 LPM HEAD- 70Mtr. | 01nos | 500000 |
| 10 | 20HP ELECTRIC JOCKY PUMP 180 LPM HEAD- 90Mtr | 02nos | 138000 |
| 11 | 102 BHP DIESEL ENGINE 2850 LPM HEAD- 70Mtr | 02nos | 1530000 |
| | **FIRE HYDRANT CONTROL PANEL SYSTEM** | | 2100000 |
| 12 | Panel -100HP+20HP+102 BHP DIESEL ENGINE | 01unit | 0 |
| 13 | Panel -100HP+20HP+102 BHP DIESEL ENGINE | 01unit | 0 |
| 14 | Installation, Fittings, flanges, orifice plate, M S fabricated Support, pump foundation ,RCC Blocks, Digging | 01unit | 1793074 |
| | | **Total** | 20842324 |
| | | **GST18%** | 3751618 |
| | | **Total Budget** | 24593942 |

सदर कामी रु.२,४५,९३,९४२/- इतका खर्च अपेक्षित असून सदर कामासाठी सन २०२२-२३ या आर्थीक वर्षात घनकचरा (डम्पिंग ग्राउड) येथे "अग्निशमन यंत्रणा उभारणे" या लेखाशिर्षा अंतर्गत रु.२५०.०० लक्ष तरतुद करण्यात आली आहे.

तसेच आगीवर त्वरीत नियंत्रण मिळवण्यासाठी उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी पाण्याच्या टाकीची व्यवस्था करणेकामी आर.सी.सी. पाण्याची टाकी व पंप रुम बांधणे आवश्यक आहे. सदर कामी रु.७१,२६,८००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

सदर कामासाठी सन २०२२-२३ या आर्थीक वर्षात येथे "अग्निशमन इमारत/निवास बांधकाम दुरुस्ती" या लेखाशिर्षा अंतर्गत रु.२००.०० लक्ष तरतुद करण्यात आली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील डम्पिंग ग्राउड प्रकल्पात COURT YARD SYSTEM WITH HYDRANT & MONITOR हि यंत्रणा उभारणे कामी रु.२,४५,९३,९४२/-, आर.सी.सी. पाण्याची टाकी व पंप रुम बांधणे कामी रु.७१,२६,८००/- खर्च अपेक्षित आहे.

सदर कामी निविदा प्रसिध्द करणे व याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

गोषवारा प्राप्त दि. 26/04/2022
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र ....93....... वर्ष :- 2022-23

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त
अग्निशमन व आणीबाणी सेवा

मा. आयुक्त सो यांच्या मान्यतेने

# // गोषवारा //

## मा. महासभा दि. 03 /08/2022

**प्रकरण क्र. २७:- मा. महासभा दि. 02/09/2021, ठराव क्र. 42 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या चतुर्थश्रेणी कर्मचारी तसेच वाहनचालक कर्मचा-यांना यांच्याकरिता दर दोन वर्षांनी गणवेश पुरवठा वस्तुरुपात मिळणा-या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करणेबाबतच्या निश्चित असलेल्या DBT धोरणास कर्मचा-यांचा प्रतिसाद न मिळाल्यामुळे DBT धोरणाचा पुर्नविचार होऊन महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित यांच्यामार्फत कपडा खरेदी करणे व गणवेशाची शिलाई दर निश्चित करुन त्यांच्या मासिक वेतनात जमा करणेबाबतचे धोरण निश्चित करणेबाबत.**

मिरा भाईंद्र महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचारी वर्ग -4 व वाहनचालक यांना दर दोन वर्षांनी भांडार विभागामार्फत Online निविदा मागवून कपडा खरेदी करून शिलाई करुन गणवेश देण्यात येत होता. त्यानंतर सन 2021-22 मध्ये गणवेश खरेदी करुन शिलाई केल्यानंतर वस्तुच्या पावतीची शहानिशा करुन पुर्णपणे खातरजमा झाल्यावर लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर योजनेत सुनिश्चित केलेल्या योजनेची रक्कम लाभार्थी कर्मचाऱ्यांच्या आधार क्रमांकाशी निगडीत बँक खात्यात जमा करणेबाबतची कार्यवाहीची पुर्तता करुन शिफारसीचे प्रमाणपत्रासह भांडार विभागास GST देयकासह भांडार विभागात जमा करणेबाबत DBT धोरणा अंमलबजावणीबाबत जा.क्र./मनपा/भांडार/222/2021-22 दि. 20/12/2021 अन्वये परिपत्रकाव्दारे सर्व विभागप्रमुख कळविण्यात आलेले आहे. परंतु फक्त एकाच चतुर्थश्रेणी शिपाई कर्मचा-याने देयक सादर केलेले असुन DBT धोरणाबाबत कर्मचा-यांमध्ये उदासिनता दिसून येते. तथापी फक्त एका कर्मचा-याने देयक सादर केल्यामुळे सन 2021-22 मधील "कर्मचारी गणवेश / पावसाळी साहित्य" या लेखाशिर्षा अंतर्गत रु. 25.00 लाखाची निधी लॅप्स झालेली आहे. तसेच दर दोन वर्षांनी दोन जोडी गणवेश देत असतो. सन 2019-20 मध्ये एक जोडी गणवेश दिला होता. त्यानंतर DBT धोरणाअंतर्गत वस्तुरुपात मिळणा-या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करणेबाबतचे धोरण मा. महासभेने निश्चित केले होते. तसेच मा. स्थायी समितीने याबाबतचे दर **"परिशिष्ट अ"** निश्चित केलेले होते. परंतु फक्त एकाच कर्मचा-याने देयक सादर केलेले आहे. त्यामुळे उक्त धोरणास प्रतिसाद न दिल्यामुळे कर्मचा-यांना गणवेश महानगरपालिकेने पुरवठा करावा किंवा खरेदीकरिता आगाऊ रक्कम त्यांना द्यावी व देयक त्यांना सादर करणेस सांगावे. अशाप्रकारे भारतीय कामगार सेना यांनी दि. 17/01/2022 रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली आहे. तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वाहनचालक वर्ग-3(क) व वर्ग-4 (ड) कर्मचा-यांना दर दोन वर्षांनी एकदा दोन गणवेश शिलाईसह वस्तुरुपात मिळणा-या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या थेट खात्यात जमा करणेबाबतचे DBT धोरण निश्चित करणेकामी मा. महासभा दि. 02/09/2021, ठराव क्र. 43 ने पारित झालेला आहे.

कृ.मा.प.

तरी **मा.स्थायी समिती सभा दि.12/02/2021, ठराव क्र. 44 अन्वये "परिशिष्ट अ"** प्रमाणे सन 2020-21 मध्ये निश्चित केलेले DBT धोरणाचे दर सन 2022-23 या वित्तीय वर्षात गणवेश कपडा व शिलाईचे दर वाढले असल्याकारणाने **"परिशिष्ट ब"** प्रमाणे गणवेशाकरिता कपडा महाराष्ट्र राज्य यंत्रमाग मर्यादीत यांचेकडील परिपत्रक क्रमांक कापड पुरवठा/यंत्रमाग/ कापड (हातमाग कापडाशिवाय) नियत किंमत /दरपत्रक/2022-23/120 दि. 12 मे 2022 अन्वये प्राप्त दरानुसार चतुर्थश्रेणी 821 व वर्ग-3 वाहनचालक 32 पुरुषांकरिता कपडा (शर्ट व पॅन्ट) व चतुर्थश्रेणी 74 स्त्रिया यांचेकरिता साड्या व ब्लाऊज पीस खरेदी करणेबाबत व पुरुष गणवेश व स्त्रियाकरिता ब्लाऊज शिलाईचे दर परिशिष्ट ब प्रमाणे निश्चित करुन त्यांच्या वेतनात मंजुर दराप्रमाणे जमा करण्याचे धोरण निश्चित करणेस मा. महासभेच्या मान्यतेच्या सविनय सादर.

| **परिशिष्ट अ** | | | | **परिशिष्ट ब** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **मा.स्थायी समिती सभा दि.12/02/2021, ठराव क्र. 44 अन्वये DBT धोरणाअंतर्गत निश्चित केलेले दर** | | | | **कपडा खरेदी करुन शिलाई कामी येणारा अंदाजित खर्च** | | | |
| चतुर्थश्रेणी कर्मचारी वर्ग - 4 -821, वाहनचालक वर्ग - 3 - 32 | **कर्मचारी संख्या** | **रक्कम (कपडा व शिलाईसह)** | **एकुण** | **बाजारभावा प्रमाणे शिलाई दर** | **महाराष्ट्र राज्य यंत्रमाग मर्यादीत यांचेकडून कपडा (5% GSTसह)** | **रक्कम (कपडा व शिलाईसह)** | **एकुण** |
| **पुरुष** (पॅन्ट, शर्ट) (शिलाईसह) 01 जोड | 853 | रु. 1090/- (एका कर्मचा-यास) | रु.9,29,770/- | रु. 750/- शर्ट,पॅन्ट प्रती जोड | सुटींग दर रु. 322.35/- x 1.30 मीटर - पॅन्ट =419 शर्टींग दर रु. 108.15/- x 2 मीटर- शर्ट = 216 **एकुण रु. 635/- प्रती जोड** | रु. 1385/- (एका कर्मचा-यास) | रु.11,81,405/- |
| **स्त्रिया** (साडी, ब्लाऊज (शिलाईसह) 01 जोडी | 74 | रु. 904/- (एका कर्मचा-यास) | रु.66,896/- | रु. 350/- प्रती ब्लाऊज | 5.50 मीटर(1 नग साडी) X 554.40 = 554.40 1 मी. ब्लाऊज x 90.30 = 90.30 **एकुण रु. 645/- (एक जोड)** | रु. 995/- (एका कर्मचा-यास) | रु. 73,630/- |
| | | **एकुण** | **रु.9,96,666/-** | | | **एकुण** | **रु.12,55,03** |
| **एक जोडीकरिता रु.9,96,666/- x 2 (दोन जोडीकरिता) = 19,93,332/-** | | | | **एक जोडीकरिता रु.12,55,035 x 2 (दोन जोडीकरिता) = 25,10,070/-** | | | |

**(दिलीप ढोले)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. 02/06/2022 साय. 6.90
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ.क्र. 94 वर्ष :- 2022-23

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. 03 / ०८ /2022

## // गोषवारा //

प्रकरण क्र. :- २८ महापालिकेच्या DCH/DCHC/CCC/रुग्णालय येथे तसेच मुख्य कार्यालय, अतिक्रमण कारवाईकरीता प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 व मनपाच्या इतर मालमत्तांच्या संरक्षणार्थ पुरुष व महिला सुरक्षारक्षक महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून पुरवठा करणेस मुदतवाढ देणेबाबत.

साथरोग प्रतिबंधात्मक अधिनियम, 1897 च्या खंड 2,3 व 4 नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार कोरोना विषाणूमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी अधिसूचना क्र.कोरोना2020/प्र.क्र.58/आरोग्य5, दि. 14 मार्च 2020 ची अंमलबजावणी सुरु झाल्याने महानगरपालिका कार्यक्षेत्रात COVID-19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक असल्याने महापालिकेच्या DCH/DCHC/CCC/रुग्णालय तसेच महानगरपालिकेस आवश्यक त्या विभागांकरीता व पाठवेल त्या ठिकाणी पुरुष व महिला सुरक्षारक्षक महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून पुरवठा करणेबाबत जा.क्र.मिभा/मनपा/आस्था/616/2021-22, दि.14/06/2021 रोजीचे कार्यादेशान्वये दि.15/06/2021 ते दि.14/06/2022 रोजीपर्यंत 01 वर्षाकरीता करारनामा करण्यात आलेला आहे.

सद्यस्थितीत कोरोना आजाराच्या अनुषंगाने नागरिकांना लसीकरणाची सुविधा देणेकरीता Covid Care Centre (CCC), Dedicated Covid Hospital (DCH), Dedicated Covid Health Centre (DCHC) व वैद्यकीय आरोग्य केंद्र येथे लसीकरण केंद्र सुरु करण्यात आलेले आहेत. सदर ठिकाणी कोव्हिड बंदोबस्त म्हणून महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून तसेच महापालिकेच्या मुख्य कार्यालय, अतिक्रमण कारवाईकरीता प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 व मनपाच्या इतर मालमत्तांच्या संरक्षणार्थ सुरक्षारक्षकांचा पुरवठा करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कोव्हीड-19 करीता DCH/DCHC/CCC/रुग्णालय/ वैद्यकीय आरोग्य केंद्र येथे कार्यरत सुरक्षारक्षक तपशिल | अ.क्र. | मनपाच्या इतर मालमतांकरीता कार्यरत सुरक्षारक्षक तपशिल |
|---|---|---|---|
| 1. | भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय | 1. | महानगरपालिका मुख्य कार्यालय |
| 2. | स्व. प्रमोद महाजन सभागृह (DCHC) | 2. | एस.के हाईट्स इमारत |
| 3. | मिनाताई ठाकरे सभागृह | 3. | दर्वेश इमारत |
| 4. | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र.241, अप्पासाहेब धर्माधिकारी हॉल | 4. | नगररचना कार्यालय |
| 5. | डेल्टा गार्डन, एम.एम.आर.डी.ए इमारत, मिरागांव | 5. | मिरारोड (पूर्व) रामदेव पार्क, आरक्षण क्र.230, मेडीटेशन सेंटर |
| 6. | कॉरेन्टाईन सेंटर R1 व R2, गोल्डन नेस्ट | 6. | मा. आयुक्त निवास |
| 7. | समृध्दी कोविड केअर सेंटर | 7. | प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 |
| 8. | हैदरी चौक ऑक्सिजन टँक | 8. | महाजनवाडी येथील तरण तलाव |
| | | 9. | स्थानिक संस्था कर कार्यालय |
| | | 10. | परवाना विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 11. | अतिक्रमण विभागाकरीता ओवरब्रिजखालील गोडाऊन |
| | | 12. | अग्निशमन विभाग |
| | | 13. | मल: निसारण प्रकल्प |
| | | 14. | श्वान निर्बिजीकरण केंद्र |

**महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन, कफ परेड यांनी त्यांचेकडील माहिती पुस्तीकेसोबत महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.19/04/2010 रोजी प्रसिद्ध झालेली अधिसूचना जोडलेली असून त्यामधील अनु.क्र.15.(1) मध्ये पुढीलप्रमाणे नमुद आहे:**

"The State Government offices, Organisations and public sector Undertakings of the State Government shall be mandated to take security from the corporation." **यावरुन महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून महानगरपालिकेने सुरक्षारक्षक नेमणूक करणे बंधनकारक आहे.**

महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सद्यस्थितीत पुरवठा करण्यात येत असलेले सुरक्षारक्षक त्यांना नेमून दिलेले कामकाज उत्कृष्टरित्या पार पाडत असून प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 करीता अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रणासाठी कार्यरत सुरक्षारक्षकांबाबत कुठल्याही प्रकारे प्रशासनाकडे तक्रार प्राप्त नाहीत. महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सुरक्षारक्षकांची मुख्य कार्यालयात नेमणूक झालेनंतर एखाद्या मोर्चा/आंदोलनाबाबत नियंत्रण आलेले असून महापालिकेमार्फत अभ्यांगतांना नेमून दिलेल्या वेळेत प्रवेशाबाबतची जबाबदारी सुरक्षारक्षकांकडून योग्यरित्या हाताळण्यात येत आहे. महापालिकेच्या DCH/DCHC/CCC/रुग्णालय येथे बेड उपलब्धतेवरुन रुग्णांचे नातेवाईक रुग्णालय व्यवस्थापनासोबत वादविवाद करतात. सदर केंद्रावर महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सुरक्षारक्षक पुरवठा केल्यानंतर सुरक्षारक्षकांनी कोविड-19 रुग्णांच्या नियंत्रणाकरीता व बंदोबस्ताकरीता चांगले कामकाज केलेले आहे.

महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी प्रा.लि. यांचेकडील पुरवठा करण्यात येत असलेल्या सुरक्षारक्षकांप्रती प्रत्येक महिन्यास रु.59,13,000/- (अक्षरी रु. एकोणसाठ लाख तेरा हजार मात्र) व 03 महिन्यास रु.1,77,39,000/- (अक्षरी रु. एक कोटी सत्याहत्तर लाख एकोणचाळीस हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च अस्थायी आस्थापना व सुरक्षा व्यवस्था तसेच आपत्ती व्यवस्थापन निधी या लेखाशिर्षातून करण्यात येणार आहे.

सदयस्थितीत कोरोना आजाराच्या अनुषंगाने लसीकरणाकरीता महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून कोव्हिड बंदोबस्त म्हणून तसेच महापालिकेच्या मुख्य कार्यालय, अतिक्रमण कारवाईकरीता प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 व मनपाच्या इतर मालमत्तांच्या संरक्षणार्थ सध्याचा 250 सुरक्षारक्षक पुरवठा दि.15/06/2022 ते दि.14/09/2022 पर्यंत पुढे चालू ठेवण्यासाठी 03 महिन्यांची मुदतवाढ महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन या संस्थेस देणेबाबत शिफारस आहे.

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. 6/6/2022
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. 96 वर्ष :- 2022/23

नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.03/05/२०२२

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. :-** २९

**विषय: वैद्यकीय आरोग्य विभागकरिता निविदा मागविणे कामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागा अंतर्गत ५० खाटांचे १ रुग्णालय, १० आरोग्य केंद्र/उपकेंद्र व १ फिरता दवाखाना कार्यरत आहे. या करीता आवश्यक औषधे, सर्जिकल मटेरीअल, लॅब मटेरीअल खरेदी करणे करीता वार्षिक निविदा मागविणे आवश्यक आहे. तसेच भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयाच्या इमारतीवर दोन मजल्याचे वाढीव बांधकाम करण्यात आलेले आहे. सदर वाढीव मजल्यावर विविध विभागाची अंतर्गत रचना, आवश्यक उपकरणाची यादी स्पेशिफिकेशन याकरीता रुग्णालय सल्लागार नेमणेची प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे. सदर रुग्णालयात आवश्यकतेनुसार इतर विभाग सुरु करावयाचे आहेत. याकरीता आवश्यक उपकरणे व फर्निचर निविदा मागवुन खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच रुग्णालयातील हाऊसकिपिंग करीता मागविण्यात आलेल्या निविदेची मुदत संपृष्टात येणार असल्याने नविन निविदा मागविणे आवश्यक आहे.

याकरिता सन २०२२-२०२३ च्या अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे लेखाशिर्षानुसार तरतुद उपलब्ध आहे.

| अ.क्र | लेखाशिर्ष | एकुण तरतुद | मागविण्यात येणाऱ्या निविदेचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | रुग्णालये/ आरोग्य केंद्र औषधे खरेदी | ४,५०,००,०००/- | १ वर्षे |
| २ | रुग्णालये सर्जिकल व लॅब मटेरीअल खरेदी/साहीत्य देखभाल दुरुस्त कामे | २,५०,००,०००/- | १ वर्षे |
| ३ | श्वानदंश/सर्पदश/कावीळ लस खरेदी | ५०,००,०००/- | १ वर्षे |
| ४ | रुग्णालयीन साफसफाई व इतर कामे | १,००,००,०००/- | ३ वर्षे |
| ५ | इंदिरा गांधी रुग्णालय येथे SNCU सुरु करणे | २,५०,००,०००/- | १ वर्षे |

वैद्यकीय आरोग्य विभागाकरिता उपरोक्त प्रमाणे वार्षिक निविदा मागविणेकरिता येणाऱ्या खर्चास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मान्यता व्हावी.

**(संजय शिंदे)**
**उपायुक्त (वैद्यकीय)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(मा. आयुक्त महोदय यांच्या मान्यतेने)**

**प्रति**
**नगरसचिव विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. 03/08/2022

## गोषवारा

30

विषय :- <u>ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांचेवर मा.न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा.आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे.</u>

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 अंतर्गत गुन्हे दाखल केल्यानंतर ॲन्टी करप्शन ब्युरोच्या अधिकाऱ्यांनी त्यांना रंगेहात पकडल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांना सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक: अभियो-1312/प्र.क्र.30/पुर्नबांधित-1/11अ, दि.12 फेब्रुवारी, 2013 मधील परिच्छेद 9(क) नुसार लाचेचा सापळा प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर अपचारी अधिकारी/कर्मचारी यांना तात्काळ निलंबीत करण्याची कार्यवाही सक्षम प्राधिकाऱ्यांनी करावी असे आदेश आहेत. या आदेशानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, 1979 मधील नियम 4 नुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 56(2) मधील तरतुदीनुसार संबंधित कर्मचारी श्री. उज्वल यशवंत संखे, मजुर यांना महानगरपालिका सेवेतून निलंबीत केलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 59-अ नुसार महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी यांचेवर खटला भरण्यास मंजूरी देणे मध्ये खालील प्रमाणे नमुद आहे:-

"कलम 53 किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्यांवर किंवा कर्मचाऱ्यांवर खटला भरण्याची मागणी पोलीसांकडून किंवा अन्य कोणत्याही शासकीय अभिकरणाकडून करण्यात आली असेल तर त्यास मंजुरी देण्यास आयुक्त सक्षम असेल. आयुक्त, अशा कोणत्याही कार्यवाहीच्या मंजुरीची माहिती नगरपालिकेच्या पुढील सभेमध्ये महानगरपालिकेला कळवील."

श्री. उज्वल यशवंत संखे, मजुर, अतिक्रमण विभाग यांचेबाबत जा.क्र.मनपा/आस्था/445/2022-23, दि.27/05/2022 रोजीच्या आदेशान्वये मा.न्यायालयात अभियोग दाखल करणेसाठी महानगरपालिका अधिनियमातील नियम 59-अ अन्वये मंजूरी दिली आहे.

तरी वर नमुद केलेल्या कार्यवाहीची माहिती महानगरपालिका अधिनियमातील कलम 59-अ नुसार मा.महासभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

## ता.जि.ठाणे, 401101

## मा. महासभा दि. 03 / 05 /2022

## // गोषवारा //

**प्रकरण क्रं 39 :- अपंग कल्याण योजना अंतर्गत दिव्यांग विदयार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग विदयार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती करीता मा. महासभा दि.02/05/2018 (दि.18/04/2018 रोजीची तहकुब सभा) प्रकरण क्रं.15, ठराव क्रं.16 नुसार खालीलप्रमाणे शिष्यवृत्ती मंजुर करण्यात आलेली आहे. सदयस्थितीत शालेय फी वाढलेली असुन सदरची शैक्षणिक शिष्यवृत्ती फार कमी असल्याने सदर शिष्यवृत्ती मध्ये खालील तक्यात नमुद प्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | शिक्षण | प्रस्तावितं करण्यात आलेली शिष्यवृत्ती | नव्याने प्रस्तावित करण्यात आलेली शिष्यवृत्ती |
|---|---|---|---|
| 1 | नर्सरी ते 4 थी इयत्ता | 5000/- | 8000/- |
| 2 | 5 वी ते 7 वी इयत्ता | 6000/- | 12000/- |
| 3 | 8 वी ते 10 वी इयत्ता | 8000/- | 14000/- |
| 4 | 11 वी ते 12 वी इयत्ता | 10000/- | 16000/- |
| 5 | 12 वी ते पदवी<br>(कला, वाणिज्य, विज्ञान शाखा) | 12000/- | 20000/- |
| 6 | 12 वी ते पदवी<br>(तांत्रिक, इतर IT व्यवसायिक) | 20000/- | 25000/- |

सन 2022-23 या अर्थसंकल्पात अपंग कल्याण योजनेकरीता एक कोटी पंच्याहत्तर लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने दिव्यांग शैक्षणिक शिष्यवृत्ती मध्ये वाढ करणेबाबतचा प्रस्ताव मा. महासभे समोर ठेवणेस स्वाक्षरी होणेस शिफारस आहे.

(रवि पवार)
उप-आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.3 / ८ / 2022**

**//गोषवारा//**

प्रकरण क्र. ३२ :- अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकरीता यंत्रसामुग्री, वाहने व मनुष्यबळ उपलब्ध करणेकामी होणाऱ्या खर्चास मा. महासभेची प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणे बाबत.

मिरा - भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, धोकादायक इमारती निष्कासित करणेकरीता यंत्रसामुग्री व वाहने उपलब्ध करणे, रस्त्यावरील पडीक बेवारस वाहने उचलणेकामी टोईंग व्हॅन उपलब्ध करणे व अनाधिकृत बांधकामे हाताने तोडणेकामी तसेच रस्त्यावरील अनाधिकृत फेरीवाले हटविणेकामी खालीलप्रमाणे आवश्यकतेनुसार यंत्रसामुग्री, वाहने व मनुष्यबळ उपलब्ध करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | तपशिल |
|---|---|
| १. | मंहिद्रा बोलेरो पिकअप /Mahidra Bolero Pickup |
| २. | टेम्पो (४०७) /Tempo (407) |
| ३. | टेम्पो (६०९) /Tempo (609) |
| ४. | टेम्पो (९०९) /Tempo (909) |
| ५. | ट्रक (१६१३) /Truck |
| ६. | डम्पर (हायवा) /Dumper |
| ७. | डम्पर /Dumper |
| ८. | ट्रॅक्टर विथ ब्रेकर |
| ९. | ट्रॅक्टर (ट्रालीसह) |
| १०. | टोईग व्हॅन (४०७) /Toing van (407) |
| ११. | टोईग व्हॅन (१६१२) /Toing van (1612) |
| १२. | जेसीबी (३ डी एक्स) /J.C.B. (3DX) |
| १३. | जेसीबी ( ३ डी एक्स) विथ ब्रेकर /J.C.B. (3 DX) With Brekar |
| १४. | पोकलन (७०) /Pokalan (70) |
| १५. | पोकलन (८०) /Pokalan (80) |
| १६. | पोकलन (२१०) /Pokalan (210) |
| १७. | पोकलन (२१०) विथ ब्रेकर /Pokalan (210) With Brekar |
| १८. | पोकलन (३००) /Pokalan (300) |
| १९. | पोकलन (३००) विथ ब्रेकर /Pokalan (300) With Brekar |
| २०. | कॉम्प्रेसर विथ ब्रेकर |
| २१. | इलेक्ट्रीक हॅन्ड ब्रेकर |
| २२. | गॅस कटर |
| २३. | इलेक्ट्रीक आर.सी.सी.स्लॅब कटर |
| २४. | हायड्रा १२ टन |
| २५. | फराना १६ टन |
| २६. | क्रेन ५० टन |
| २७. | क्रेन १०० टन |
| २८. | अतिक्रमण व अनधिकृत बांधकामावर, धोकादायक इमारतींवर कारवाई करणेकरीता तसेच रस्त्यावरील अनाधिकृत फेरीवाले यांच्यावर कारवाई करणे करीता आवश्यकतेनुसार मनुष्यबळ उपलब्ध करणे. (तोडक साहित्यासह) |

सन २०२२ – २३ च्या मंजूर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात ८ (४) जेसेबी, गॅस कटर्स, ट्रक खरेदी / भाडयाने करणे करीता रु.३.०० कोटी तरतूद आहे. तसेच ८ (५) मुख्य रस्त्यावरील अनाधिकृत फेरीवाले हटविणे येणाऱ्या खर्चा करीता रु.२.०० कोटी तरतूद आहे.

तरी अनाधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, धोकादायक इमारती निष्कासित करणेकरीता यंत्रसामुग्री व वाहने उपलब्ध करणे, रस्त्यावरील पडीक बेवारस वाहने उचलणेकामी टोईंग व्हॅन उपलब्ध करणे व अनाधिकृत बांधकामे हाताने तोडणेकामी मनुष्यबळ उपलब्ध करणेसाठी रक्कम रुपये ३.०० कोटी तसेच रस्त्यावरील अनधिकृत फेरीवाले हटविणेकामी मनुष्यबळ उपलब्ध करणेसाठी रक्कम रुपये २.०० कोटी इतका खर्च अपेक्षित असून सदर कामी मा. महासभेची प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. 08/07/2022 3.94
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. 23 वर्ष :- 2022-23

नगरसचिव
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. 03/ 08 /2022

//गोषवारा//

35

प्रकरण क्र. मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ), माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ), व सिस्टिम ॲनालिस्ट (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत.

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि. 25 नोव्हेंबर, 2021 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ), माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ), व सिस्टिम ॲनालिस्ट (गट-ब) या संवर्गात पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात आली आहे.

| पदनाम व श्रेणी | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|
| अतिरिक्त शहर अभियंता (श्रेणी - 01 अभियांत्रिकी सेवा) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता या पदावर किमान 03 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व मान्यताप्राप्त विद्यापिठाची अभियांत्रिकी पदवी धारण केलेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| माता व बाल कल्याण अधिकारी (श्रेणी - 01, वैद्यकीय सेवा) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत वैद्यकीय अधिकारी/अपघात वैद्यकीय अधिकारी पदाचा किमान 3 वर्षाचा अनुभव असणाऱ्या व पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या (M.D) अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| सिस्टिम ॲनालिस्ट (श्रेणी - 02, तांत्रिक सेवा) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर)/संगणक प्रोग्रामर या पदावर किमान 03 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

मिरा भाईंदर महानगरपालिका आकृतीबंधानुसार व मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 नुसार अतिरिक्त शहर अभियंता - 01 पद, माता व बाल कल्याण अधिकारी -01 पद, व सिस्टिम ॲनालिस्ट -01 पद पदोन्नतीने भरावयाचे आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :-एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट,2019 नुसार शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.उ (3) नुसार विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची अ.क्र. i) ते Xiii) मधील निकषांच्या आधारे पात्रता तपासणेबाबत नमुद आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे, 2021 नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.2797/2015 या प्रकरणी दि.04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावी असे निर्देश आहेत. तसेच सदर पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील अशी कार्यवाही करताना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये असे निर्देश आहेत.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.दिव्यांग 2015/प्र.क्र.171/16-अ, दि.23 जुलै, 2021 नुसार सर्व आस्थापनांनी गट-अ व गट-ब संवर्गातील पदोन्नतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.22/07/2021 रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे (100%) भरण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशी कार्यवाही करताना मा.उच्च न्यायालयाच्या दि.22/07/2021 रोजीच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश आहेत.

अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ), माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ), व सिस्टिम ॲनालिस्ट (गट-ब) या पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54(1) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि.30/05/2022, दि.31/03/2022, व दि.07/07/2022 रोजी आयोजित करण्यात आली होती.

अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ), माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ), व सिस्टिम ॲनालिस्ट (गट-ब) या संवर्गातील रिक्त पदावर पदोन्नती देणेबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.01 ऑगस्ट, 2019 मध्ये विहित कार्यपध्दतीनुसार रिक्त पदांचा व विचार क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचा पदोन्नती देण्याचा प्रस्ताव पदोन्नती निवड समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. पदोन्नती निवड समितीने खालील अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती समितीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात अटीशर्तींच्या अधिन राहून पदोन्नती देणेकरीता शिफारस केली आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव व वेतनश्रेणी | सद्याचे पद | पदोन्नतीचे पद | नेमणूक प्रवर्ग | पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री. सुरेश वाकोडे<br>S-23 67700-208700 | कार्यकारी अभियंता | अतिरिक्त शहर अभियंता | खुला | S-25 78800-209200 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2. | डॉ. प्रमोद पडवळ<br>S-20 56100-177500 | वैद्यकीय अधिकारी | माता व बाल कल्याण अधिकारी | खुला | S-23 67700-208700 |
| 3. | श्रीम. मनस्वी मंगेश म्हात्रे<br>S-13 35400-112400 | संगणक प्रोगामर | सिस्टिम ॲनालिस्ट | खुला | S-15 41800-132300 |

अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ), माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ), व सिस्टिम ॲनालिस्ट (गट-ब) संवर्गातील पद असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) अन्वये सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महापालिकेमध्ये निहित आहे.

त्यामुळे अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ), माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ), व सिस्टिम ॲनालिस्ट (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 मधील अनुक्रमांक 6 नुसार वर्ग-01 ची पदे पदोन्नतीने भरताना त्यास शासनाची पुर्वमंजुरी आवश्यक असल्यामुळे अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ) व माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ) या पदास शासन मान्यता मिळण्याच्या अधिन राहून सदर पदोन्नतीने नेमणूक करणेस मा. महासभेच्या मंजुरीस्तव सादर.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.03 / ८ /2022.**

**सार्व. आरोग्य विभाग**

**// गोषवारा //**

**प्रकरण :- 3६ "महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयीसुविधांचा विकास" या योजनेअंतर्गत 06 प्रभागात "बॅटरी ऑपरेटेड लिटर सक्शन मशीन "गोब्बलर" (सफाई यंत्र)" एकुण 12 मशिन खरेदी करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका जि. ठाणे करीता महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकास या योजनेअंतर्गत रक्कम रु. 05 कोटी इतका निधी वितरीत करणे शासन निर्णय क्रमांक मनपा-2022/प्रक्र.142(18-अ) /नवि16 दि.10/06/2022 अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्यापैकी महानगरपालिकेच्या 06 प्रभागात एकुण "बॅटरी ऑपरेटेड लिटर सक्शन मशीन "गोब्बलर" (सफाई यंत्र)" 12 उपलब्ध करुन देणे करीता रु. 2.40 कोटी मंजुरी दिलेली आहे.

शासन निर्णयानुसार "महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयीसुविधांचा विकास" या योजनेअंतर्गत 06 प्रभागात "बॅटरी ऑपरेटेड लिटर सक्शन मशीन "गोब्बलर" (सफाई यंत्र)" एकुण 12 मशिन खरेदी कामची ई-टेंडरींद्वारे निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

**(डॉ. संभाजी पानपट्टे)**
**अतिरिक्त आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.3 /8/2022.

सार्व. आरोग्य विभाग

// गोषवारा //

प्रकरण :- 30 **मनपा. क्षेत्रातील स्मशानभुमिमध्ये दैनंदिन साफसफाई व प्रेत दहन करणेकामी कंत्राटी सफाई कामगारांचा पुरवठा कामाची निविदा मागविणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून उत्तन, मोर्वागाव, राईगाव, मुर्धागाव, भाईंदर (प.) भोलानगर, भाईंदर (पूर्व) बंदरवाडी, गोडदेव, नवघर, मिरारोड, पेणकरपाडा, काशिगाव, घोडबंदर गाव, रेतीबंदर, चेनागाव याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीच्या सद्यस्थितीत 16 स्मशानभुमी आहेत. सदर स्म्शानभुमिमध्ये दैनंदिन साफसफाई तसेच प्रेत दहन करणेकामी कामगारांची आवश्यकता असते. सदर ठिकाणी दैनंदिन साफसफाई व प्रेत दहन करणेकामी स्थायी कर्मचारी उपलब्ध नसल्याने मोठ्याप्रमाणात अडचणी येत असून मा. नगरसेवक व नागरीकांच्या तक्रारी येत असतात. स्मशानभुमिमध्ये दैनंदिन साफसफाई तसेच प्रेत दहन करणेकामी 44 कंत्राटी सफाई कामगारांची आवश्यकता आहे.

सदरकामी वार्षिक अंदाजे रक्कम रु. 2.00 कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सन 2022-23 या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील “वॉर्ड साफसफाई” या लेखाशिर्षातील तरतुदीतुन करण्यात येईल. तरी सदर कामाची निविदा मागवविणेस मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

19.7.22

**(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)**

**(रवि पवार)**
**उप-आयुक्त (आरोग्य)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**